महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


=====================================================================

जावक क्रमांक – ३०९२ / ४४ दिनांक :- १५ ऑगस्ट, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# स्वातंत्र्य दिनानिमित्त म्हाडा मुख्यालयात ध्वजारोहण उत्साहात

मुंबई, दि. १५ ऑगस्ट, २०२४ – भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी खेरवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस पथक, महाराष्ट्र सुरक्षा बल पथक व म्हाडातील सुरक्षारक्षकांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. राष्ट्रध्वजाला सलामी दिल्यानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत वाजविण्यात आले.

यापसंगी म्हाडातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निमित्ताने म्हाडाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमांतर्गत देशसेवेसाठी दिलेल्या बहुमूल्य योगदानाबद्दल माजी सैनिक या प्रवर्गातून सद्यस्थितीत म्हाडा सेवेत कार्यरत असलेले २२ कर्मचारी यांचा 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी म्हाडा कर्मचाऱ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. जयस्वाल यांनी उपस्थित अधिकारी - कर्मचारी यांच्याशी संवाद साधताना स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. श्री. जयस्वाल म्हणाले की, म्हाडा एक लोकाभिमुख कार्यालय आहे. त्यामुळे म्हाडा कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या प्रश्नांबाबत प्रत्येक अधिकारी - कर्मचारी यांनी संवेदनशील असणे अत्यंत महत्वाचे आहे. म्हाडातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या लोकशाही दिन कार्यक्रमाच्या दरम्यान अनेक लोकांच्या तक्रारींचे स्वरूप लक्षात आले आहे. त्यादृष्टीने काही धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे, असे श्री. जयस्वाल यांनी सांगितले व ते पुढे म्हणाले की, लोकशाही दिनाचे आयोजन खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल जेव्हा नागरिकांच्या तक्रारी संपुष्टात येतील आणि हे उद्दीष्ट साध्य करण्याकरिता म्हाडा परिवारातील प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले योगदान दिले पाहिजे. तसेच म्हाडा ही गृहनिर्मिती क्षेत्रात देशातील अग्रेसर संस्था ठरते व नजीकच्या भविष्यात म्हाडाच्या कामाची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील घेतली जाईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

तसेच श्री. संजीव जयस्वाल म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येमुळे घरांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. बदलत्या काळात दर्जेदार घरांची निर्मिती व परवडणारे दर यांची सांगड घालणे याचे कौशल्य म्हाडाकडे आहे. आज म्हाडाची घरे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली असल्याचे बोलले जात आहेत यावर घरांच्या किंमती कमी करण्यासाठी लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देखील यापसंगी त्यांनी दिले. म्हाडाच्या सेवेत असलेल्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यास मला अभिमान वाटल्याचेही श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

यावेळी मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य

अभियंता श्री. शिवकुमार आडे, वित्त नियंत्रक श्री. अजयसिंह पवार, सचिव व उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अनिल अंकलगी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. रविंद्र पाटील, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. संजय शिंदे आदींसह म्हाडातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कर्मचाऱ्यांतर्फे देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी श्री. हेमंत पाटील यांनी केले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा




---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

================================================================

Outward No. 3092/44 Dt. 15/08/2024

**Press Release**

**Independence Day Celebrations: MHADA Honors Ex-Servicemen and Employees**

Mumbai, August 15, 2024 – The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) celebrated India's 78th Independence Day at its headquarters in Bandra East. The flag was hoisted by MHADA's Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal.

The event included a salute to the national flag by the local police, the Maharashtra Security Force, and MHADA's security team. After the flag was raised, the national and state anthems were played.

MHADA officers and staff attended the ceremony in large number. During the event, Mr. Jaiswal honored MHADA employees who are ex-servicemen, with shawl and shrifal , thanking them for their service to the nation.

In his address, Mr. Jaiswal conveyed his best wishes for Independence Day and highlighted the importance of addressing the concerns of citizens who visit MHADA offices. He noted that the grievances received during MHADA's Lokshahi Din programs underline the need for strategic policy decisions. Mr. Jaiswal stressed that the success of these programs depends on the resolution of citizens' complaints and urged every MHADA employee to play a role in achieving this goal. He also expressed confidence that MHADA, a leading entity in the housing sector, will soon gain international recognition for its efforts.

Mr. Jaiswal further addressed the growing demand for housing driven by population increases, reaffirming MHADA's commitment to provide quality housing at affordable prices. He assured that MHADA will soon take steps to reduce housing costs, addressing concerns that MHADA homes are becoming increasingly out of reach for

the general public. He also expressed pride in honoring the ex-servicemen currently working with MHADA.

The event was attended by key officials, including Mr. Milind Shambharkar, Mr. Milind Borikar, Mr. Dheerajkumar Pandirkar, Mr. Shivkumar Ade, Mr. Ajaysingh Pawar, Mr. Anil Wankhede, Mr. Anil Ankalgi, Mr. Ravindra Patil, Mr. Umesh Wagh, Mrs. Vaishali Gadpale, and Mr. Sanjay Shinde.

MHADA employees also performed patriotic songs, and the program was anchored by Public Relations Officer Mr. Hemant Patil.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA